**मे.पराग अँग्रो फुड्स अँन्ड अलाईड प्रॉडक्टस् प्रा. लि. मु.पो. रावडेवाडी, ता.शिरूर,जि.पुणे. यांच्या प्रस्तावित मळीवर आधारीत ४५ हजार लि. प्रती दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाच्या जनसुनावणीचे इतीवृत्त.**

मे.पराग अँग्रो फुड्स अँन्ड अलाईड प्रॉडक्टस् प्रा. लि. मु.पो. रावडेवाडी ता.शिरूर,जि.पुणे. यांच्या प्रस्तावित मळीवर आधारीत ४५ हजार लि. प्रती दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्पाची जनसुनावणी दि.१० जुलै,२०१९ रोजी प्रकल्पाच्या जागेवर सकाळी ११.०० वा.घेण्यात आली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेश क्र.ई ३९/२०१९ च्या सहसंचालक (ज.प्र.नि.)/पी.एच/बी २२४६ दि.२४/०६/२०१९ नुसार खालील जनसुनावणीची समिती गठीत करण्यात आली.

१. अतीरिक्त जिल्हा दंडा अधिकारी,पुणे.
(जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच् प्रतिनीधी — अध्यक्ष

२. प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा प्रतिनीधी) — सदस्य

३. उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ,पुणे-२. — समन्वयक

जनसुनावणीचे समन्वयक तसेच उप-प्रादेशिक अधिकारी, श्री. उपेंद्र कुलकर्णी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-२ यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्षा, डॉ. जयश्री कटारे तसेच जनसुनावणी समितीचे सदस्य श्री.दिलीप खेडकर व जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले. प्रथमत: समन्वयकांनी सदर जनसुनावणीचे कारण विस्तृत केले. पर्यावरण व वने तसेच वातावरण बदल मंत्रालय, भारत सरकार यांनी पारित केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना दि.१४ सप्टेंबर, २००६ तसेच त्यात केले गेलेले बदल दि.०१, डिसेंबर, २००९ प्रमाणे काही प्रकल्पांबाबत जनसुनावणी घेणे अनिवार्य आहे, त्यानुसार सदर आसावणी प्रकल्प या आधिसूचनेमध्ये वर्ग ऐ-५ (जी) मध्ये मोडत असल्यामुळे जनसुनावणी घेण्यात येत आहे.

तसेच समन्वयकांनी वर उल्लेखित केलेल्या अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या तारखेपूर्वी एक महिना आगोदर म्हणजेच ०१ जून,२०१९ रोजी मराठी वृत्तपत्र लोकसंख्या तसेच इंग्रजी वृत्तपत्र इंडियन एक्यप्रेस यामध्ये जनसुनावणीबाबत जाहीर नोटीस देण्यात आली होती, त्याच प्रमाणे प्रकल्पाबाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व मराठी व इंग्रजी भाषेमधील संक्षिप्त टिप्पणी वेगवेगळ्या शासकिय कार्यालयात वाचण्यासाठी ठेवण्यात आला होता असे सांगितले.त्यानंतर जनसुनावणी समितीचे मा.अध्यक्ष यांची परवानगी घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सदर प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रकल्पाचे सादरीकरण करून खालिल संक्षिप्त माहिती उपस्थितांना दिली.

मे.पराग अँग्रो फुड्स अँन्ड अलाईड प्रॉडक्टस् प्रा. लि मु.पो. रावडेवाडी ता.शिरूर,जि.पुणे.यांच्या प्रस्तावित मळीवर आधारीत ४५ हजार लि. प्रती दिन क्षमतेच्या आसवणी प्रकल्प उभारत असून सदर प्रकल्प हा सध्या

अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्या जागेवर उभा राहणार असून प्रस्तावित प्रकल्पामध्ये हवा तसेच पाणी प्रदूषण होऊ नये यासाठी घेण्यात येणा-या उपाययोजनांबद्दल माहिती दिली. तसेच प्रस्तावित प्रकल्पाबाबतची थोडक्यात माहिती उपस्थितांना करून दिली.

श्री. दिलीप खेडकर, सदस्य,जनसुनावणी समिती यांनी जमलेल्या उपस्थितांना जनसुनावणी बाबतची संकल्पना विस्तृत केली, तसेच उपस्थितांना त्यांची मते, आक्षेप मांडण्याबाबत विनंती केली जेणेकरून त्यांची मते व आक्षेप हे पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल यामध्ये घेतली जातील तसेच उपस्थितांना ही एक संधी असून त्यांनी त्यांचे विचार व मते मांडावेत जेणेकरून पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात येतील. तद्नंतर काही उपस्थितांनी आपल्या शंका मांडल्या त्या खालिल प्रमाणे, त्याचबरोबर प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार यांनी त्याच्या शंकाना उत्तरे दिली.

१. **श्री. रामदास सदाशिव भांगरे, रा. टाकळी हाजी, ता. शिरूर,जि.पुणे**

- प्रस्तावित आसवणी प्रकल्पामधून निर्माण होणा-या सांडपाण्यावर कोणती प्रक्रिया करण्यात येणार आहे?

**प्रकल्प प्रवर्तक**- सदर प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी या प्रकल्पातून निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी मल्टिपल इफेक्ट इव्होपरेटर बसविण्यात येणार असून त्यातून निघणा-या कंडनसेटवर पुढे प्रक्रिया करून सदर पाणी पुन्हा उत्पादन प्रक्रियेसाठी वापरण्यात येणार आहे. तसेच मल्टिपल इफेक्ट इव्होपरेटरद्वारे प्रक्रिया केल्यानंतर निर्माण होणारा घनकचरा हा १६ टन प्रती/ तास क्षमतेच्या बॉयलरला इंधन म्हणून वापरण्यात येणार आहे, असे सांगितले.

२. **श्री.ज्ञानदेव गणपत जरे, कवठे यमाई, ता. शिरूर. जि.पुणे.**

- सदर आसावणी प्रकल्पामधून कोणती उत्पादने घेतली जाणार आहेत ?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सदर आसवणी प्रकल्पामधून अल्कोहोल, इथोनॉल, रेक्टिफाईड स्पिरिट इत्यादींचे उत्पादन घेतले जाणार आहे, असे सांगितले.

३. **श्री.प्रविण अनंता पवार, अमदाबाद फाटा, ता. शिरुर, जि,पुणे.**

प्रस्तावित प्रकल्पाच्या जवळचे गाव ६ किमी अंतरावर आहे, प्रकल्पामधून हवा प्रदूषण होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली जाणार आहे ?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पामधून हवा प्रदूषण होऊ नये यासाठी इलेक्ट्रो स्ट्रॅटिक प्रेसिपीटेटर तसेच ७२ मि.उंचीचे धुरांडे बसविण्यात येणार आहे, असे सांगितले.

४. **श्री.शंकर बाबूराव गदादरे., पो. मालठन,ता.शिरूर,जि.पुणे.**

- प्रस्तावित प्रकल्पामुळे किती रोजगार निर्मिती होणार आहे ?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पात ७२ कामगारांची आवश्यकता भासणार असून त्यामध्ये ३० कुशल कामगारांची जरूरी आहे.

५. **श्री. सोमनाथ नामदेव शिंदे, रा. गारखोलवाडी, ता.शिरूर,जि.पुणे.**

प्रस्तावित प्रकल्प साधारणपणे कधी सुरी होणार आहे ?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी शासनाच्या सर्व परवानग्या मिळाल्यानंतर साधारणपणे प्रकल्प सुरू होण्यास २ वर्षे लागतील, असे उपस्थितांना सांगितले.

६. **श्री. संदिप पांडूरंग नरवडे, रा. सावीनदने, ता.शिरूर,जि.पुणे.**

- प्रस्तावित प्रकल्पासाठी कोणता कच्चा माल वापरला जाणार आहे ?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी मळी हा मुख्यत्वे: करून कच्चा माल वापला जाणार आहे, असे सांगितले.

७. **श्री. कोमलसिंग भिमराव पाटील, रा. कवठे यमाई, ता.शिरूर,जि.पुणे.**

- सदर प्रकल्पासाठी पाण्याची उपलब्धता कशी होणार आहे ?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पासाठी घोड नदीवरून पाणी आणले जाणार असून त्यासाठी पाट बंधारे विभाग महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात येणार आहे, असे सांगितले.

८. **श्री. स्वप्निल बबन वाघदरे, रा.कवठे यमाई, ता.शिरूर,जि.पुणे.**

- प्रस्तावित प्रकल्प कोणत्या जागेत उभा राहणार आहे ?

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्प सध्या स्थित असलेल्या साखर कारखान्याच्या जागेमध्ये उभा राहणार आहे, असे सांगितले.

९. **मा. डॉ. जयश्री कटारे, जनसुनावणी समिती अध्यक्ष**

**जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या जनसमुदायापैकी किती लोक हे जवळील गावांमधून आलेले आहेत, तसेच किती लोक या जागेवर स्थित असलेल्या साखर कारखान्याचे कर्मचारी आहेत ? जे लोक जवळील गावातून आलेले आहेत, त्यांनी हात वर करावा किंवा उभे रहावे जेणेकरून त्यांच्या साधारण संख्येचा अंदाज येईल.**

**प्रकल्प प्रवर्तक**- यांनी उपस्थितांपैकी जे लोक प्रस्तावित प्रकल्पाच्या जवळील गावांतून आलेले आहेत, त्यांनी हात वर करावे किंवा उभे रहावे अशी विनंती केली, त्याप्रमाणे उपस्थितांपैकी बाहेरिल गावांमधून आलेले लोक यांनी उभे राहून आपली संख्या दर्शविली, त्याचप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांनी सदर लोक हे प्रकल्पाच्या आजूबाजूतील साधारण ८ ते १० किमी.च्या परिसरातून आल्याचे सांगितले.

१०. **श्री. दिलीप खेडकर, जनसुनावणी समिती सदस्य**

प्रकल्प प्रवर्तकाच्या पर्यावरण सल्लागारांनी जनसमुदायातून विचारल्या गेलेल्या प्रश्नाची उत्तरे ही व्यवस्थित तसेच पर्यावरणाच्या दृष्टिने असावीत, असे सांगितसे. कारण जनसुनावणीची प्रक्रिया ही कॅमेरामध्ये कैद होत आहे. पुढे श्री. दिलीप खेडकर यांनी प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मूल्यांन अहवालाचा अभ्यास हा ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८ या दरम्यान केलेला असल्याचे दिसून

येते, त्यावेळी साखर कारखाना हा सुरू असल्यामुळे प्रारूप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये साखर कारखान्याच्या परिसरातील ध्वनीची पातळी ही शेजारिल निमगांव या गावाच्या ठिकाणी मोजण्यात आलेल्या ध्वनीच्या पातळीपेक्षा कमी असल्याचे दिसून येते, त्यामुळे परत ध्वनीची पातळी मोजून अहवालामध्ये नमूद करण्यात आली. तसेच १६ टन प्रती/ तास क्षमतेचा नवीन बॉयलर बसविणार असून त्यासाठी वेगळा इलेक्ट्रो स्ट्रॅटिक प्रेसिपीटेटर ( अतिरिक्त हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा) बसविण्यात येणार असल्याचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले. सगर बाब लक्षात घेता सध्या साखर कारखान्याच्या बॉयलरला अस्तित्वात आसणारा इलेक्ट्रो स्ट्रॅटिक प्रेसिपीटेटरचा वापर करता येऊ शकतो का, याची पडताळणी करावी. तसेच प्रस्तावित आसवणी प्रकल्पासाठी वापरण्यात येणारा बॉयलर हा साखर कारखान्याच्या अस्तित्वात असणा-या धुरांड्याला जोडण्यात येणार असल्याचे समजते. यासाठी प्रकल्प प्रवर्तकाना सदर अस्तित्वात आसणारे धुरांडे, त्याची लांबी, रूंदी व उंची त्याचप्रमाणे नवीन प्रसिपीटेटर बसविल्यामुळे निर्माण होणा-या समस्या या बाबत विचार करण्यात यावा असे सांगितले.

**प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी श्री. दिलीप खेडकर, जनसुनावणी समिती सदस्य यांच्या सूचना लक्षात घेतल्या जातील व त्यांस अनुसरून अंमलबजावणी केली जाईल, असे सांगितले.

**११. मे. चेयुथा रूरल अन्ड एन्व्हायरमेंट डेव्हलपमेंट सोसायटी, वाडापल्ली गाव, जि.नालगोंडा, तेलंगणा**

या संस्थेचे लिखीत पत्र म.प्र.नि मंडळास प्राप्त झाले. सदर संस्खेने प्रस्तावित प्रकल्पास अनुमती दर्शवली. तसेच प्रकल्पातून हवा प्रदूशण होणार नाही, नाकरी नसलेल्या तरूणांसाठी स्किल डेव्हलेपमेंट कार्यक्रम राबविण्यात यावा, तसेच गावातून आरोग्याच्या तपासणी करण्यात याव्या व प्रस्तावित उद्योगातील सी.एस.आर फंड गावातील समितीकडे सोपवावा, असे उल्लेखित केलेले आहे.

**१२. डॉ. जयश्री कटारे, जनसुनावणी समिती अध्यक्ष**

- आतापर्यांत प्रकल्पाकडून सी.एस.आर फंडाचा निधीचा कसा वापर करण्यात आलेला आहे?
- **प्रकल्प प्रवर्तक**- प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सी.एस.आर फंडांतर्गत झाडे लावणे तसेच शाळांना संगणक देणे यांसारखी कामे हाती घेतली असल्याचे सांगितले.

  त्यांस अनुसरून जनसुनावणी अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकास ज्या शाळांना संगणक दिले आहेत, त्यांची नावे देण्यात आली. तसेच कोणत्या भागात झाडे लावण्यात आली त्याची माहिती देण्यात यावी, असे सुचित केले. तद्नंतर प्रकल्प प्रवर्तकाने सी.एस.आर फंडातर्गत दुष्काळाच्या दिवसामध्ये ८०० ते ९०० जनावरांसाठी चारा छावण्या उभारण्यात आल्या होत्या, तसेच भूमीपुत्र शेतक-यांसाठी त्यांच्या मागणीनुसार विहीरी बांधून देण्यात आलेल्या आहेत,त्याचप्रमाणे रावडेगांव येथील देवळाला एक मोठा हॉल बांधून देण्यात आलेला आहे. मध्यंतरी रावडेगाव या गावामद्ये आगीदरम्यान डळालेल्या घरांना ५० लाख रू.चा निधी देण्यात आला आहे.

**१३. . .श्री. दिलीप खेडकर, जनसुनावणी समिती सदस्य**

उपरोक्त सी.एस.आर फंडातील रकमेचा विनीयोग पाहता .श्री. दिलीप खेडकर यांनी सा.एस.आर फंडातील काही रक्कम ही पर्यावरणासाठी खर्च करावी तसेच आजूबाजूतील गावातील सांडपाणी एकत्र करून घरगुती सामूहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविण्यासाठी उपाययोजना करता येते का

ते पहावे. तसेच प्लॅस्टिक पिशव्या बंदीसाठी जन प्रबोधन करण्यात यावे आणि कापडी पिशव्या तसेच कागदी पिशव्या वापरण्यासाठी कार्याक्रम हाती करण्यात यावा.
**प्रकल्प प्रवर्तक** प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सी.एस.आर फंडातील काही भाग हा पर्यावरणाच्या दृष्टीने चांगल्या कामासाठी वापरण्यात येईल, याची हमी दिली.

शेवटी उपस्थितांकडून प्रकल्पाबाबत प्रश्न किंवा सल्ले उपस्थित केले जात नाही हे लक्षात आल्यावर मा. जनसुनावणी अध्याक्ष यांनी जनसुनावणीचे इतीवृत्त तज्ञ समिती पर्यावरण व वने तसेच वातावरण बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात येईल, असे सांगून जनसुनावणी संपली असल्याचे जाहीर केले.

(उपेंद्र कुलकर्णी)
समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि मंडळ पुणे-२.

(दिलीप खेडकर)
समिती सदस्य तसेच प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि मंडळ, पुणे.

डॉ. जयश्री कटारे
समिती अध्यक्ष तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी, पुणे.